जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स
6 MAY 2016

# डॉ. पवार 'मॅन ऑफ क्रायसिस'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



अरुण भोसले

'शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या कारकीर्दीवर नजर टाकली असता ते 'मॅन ऑफ क्रायसिस' होते. अर्थात कोणत्याही पेचप्रसंगातून मार्ग काढण्याचे त्यांचे कौशल्य वादातीत होते,' अशा शब्दांत ज्येष्ठ विचारवंत डॉ. अरुण भोसले यांनी त्यांचा गौरव केला.

डॉ. पवार यांच्या ११०व्या जयंतीनिमित्त आज डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनीच्या वतीने आयोजित विद्यार्थी भवनमधून 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत शिक्षण घेतलेल्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा व पुरस्कार वितरण समारंभ अशा संयुक्त समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

**विद्यार्थी भवनमध्ये आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा**

डॉ. आप्पासाहेब पवार यांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत मोलाचे योगदान असल्याचे सांगून डॉ. भोसले म्हणाले, 'एक शिक्षक, प्राध्यापक म्हणून आप्पासाहेबांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होतेच, पण महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला दिशा देणारे प्रशासक म्हणूनही त्यांची कारकीर्द संस्मरणीय ठरली. महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वी मुंबई प्रांताचे शिक्षण संचालक म्हणून त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. ही त्यांची कारकीर्द खरे तर शिक्षण क्षेत्राचे सुवर्णयुगच म्हणायला हवे. या काळात त्यांनी पाचवीपासून ऐच्छिक इंग्रजी अभ्यासक्रमाची सुरवात केली. शैक्षणिकदृष्ट्या मागास विदर्भ-मराठवाड्याला या क्षेत्रात पुढे आणण्यासाठी अक्षरशः जिवाचे रान केले. विदर्भातील सुमारे ३५० तर मराठवाड्यातील १३१ गावांना झंझावाती भेटी देऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या विभागाच्या शैक्षणिक विकासासाठी पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षित लोकांनी पुढाकार घ्यावा, अशी त्यांची तळमळ होती. त्यातूनच मराठवाड्यात रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे याच महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत, हा या दोन कुलगुरूंना जोडणारा एक महत्त्वाचा धागा आहे.'

यावेळी विद्यार्थी भवनच्या आदर्श व गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यामध्ये दत्तात्रय निवृत्ती सवदे (एम.कॉम. भाग-२) आदर्श विद्यार्थी ठरला, तर आसमा अहमद सय्यद (एम.ए. भाग-२) आदर्श विद्यार्थिनी ठरली. नमिता गावडे, समाधान गायकवाड, आसमा सय्यद, संभाजी करडे, रेश्मा बाबर, भगवान पाटील, रेवणनाथ नवले, राहुल बेळंके यांचा गुणवंत विद्यार्थी म्हणून सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. बी.एल. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. टी.के. सरगर यांनी परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. एस.जे. नाईक यांनी आभार मानले. अमित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थी भवनचे आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

## कृतज्ञ जाणीव

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ आज नॅक रँकिंगमध्ये राज्यात पहिले, एनआयआरएफ रँकिंगमध्ये देशात २८ वे तर राज्यात पहिले, ऑनलाइन संदर्भ पाहण्यात देशात दुसरे अशी यशाची अनेक शिखरे काबीज करत आहे. या पाठीमागे आप्पासाहेबांनी केलेली पायाभरणीच कारणीभूत आहे, याची कृतज्ञ जाणीव बाळगली पाहिजे.'



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India
6 MAY 2016

# Russian faculty to visit Shivaji varsity in August

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** A faculty from the Lomonosov Moscow State University in Russia will visit the Shivaji University in August under the Global Initiative of Academic Networks (GIAN) scheme.

S R Yadav, head of the department of botany said: "We are in the talks with the Russian faculty, D D Sokoloff. We are sure his knowledge will be quite helpful for our students."

The ministry of human resource development has given nod to the three courses in the SUK under GIAN, while the university had sent nine proposals.

The other two courses for which international experts are coming in the 2016-17 academic year are nanotechnology and geology.

The experts are from the University of Grenoble, France and the Purdue University in US. They are likely to visit the university by December, an official said.

University officials said only 20 universities across the country have been selected under GIAN and the SUK is one of them.

The selection criteria were based on National Assessment and Accreditation Council (NAAC) grade and important memorandum of understandings (MoUs).

The official said the local faculty member of the university will act as host for the foreign expert.

After the end of the teaching, a test will be conducted and credits will be granted to the students. For the courses under GIAN, only a limited number of students will be able to attend the expert lecture, out of which 50% will be from other universities, the official said.

File photo



The HRD ministry has given nod to three courses in SUK under GIAN

## Global initiative

- The HRD ministry has proposed to invite up to 1,000 academics from around the world each year to teach in centrally-recognized Indian universities.
- GIAN will initially include participation of foreign faculty as visiting faculty to deliver short or semester-long courses.

जनसंपर्क कक्ष
महाराष्ट्र टाईम्स 6 MAY 2016 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सौरऊर्जेतील युवा संशोधक



> इतर लोक काय करतात त्यापेक्षा तरुणांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात असं काम करावं ज्याचा उपयोग मानवी प्रगतीसाठी होईल. मार्ग खडतर असला तरी अशक्य नसतो.
>
> **- जास्मिन शेख**

amit.gadre
@timesgroup.com

**यंगीस्तान**

**कोल्हापूर :** लिंडावू (जर्मनी) येथे होणाऱ्या ६६व्या लिंडावू नोबेल लॉरेट मिटिंगसाठी जगभरातून अर्ज आले होते. त्यातील ८० देशांमधून ४०२ युवा संशोधकांची निवड केली आहे. २६ जून ते १ जुलै दरम्यान होणाऱ्या मिटिंगसाठी दोन मराठी नावे आहेत. त्यात पुण्यात संशोधन करणारे संजय लट्ठे आणि आपल्या शिवाजी विद्यापीठात संशोधन करणाऱ्या जास्मिन शेख.

वर्षातून एकदा ३० ते ४० नोबेल पारितोषिक विजेत्यांसोबत त्या क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थी आणि संशोधकांना थेट संवाद साधता येतो. यामध्ये सहभागी होण्यासाठी आपले रिसर्च पेपर्स आणि प्रोजेक्ट पाठवावे लागतात. यंदाची मीटिंग ही भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत्यांसोबत होणार आहे. उत्कृष्ट बायोडेटा आणि रिसर्च पेपर्स असल्याने जास्मिन यांची मीटिंगसाठी निवड केली आहे. तिथे जाऊन भौतिकशास्त्रातील एकोणतीस नोबेल पारितोषिक विजेत्यांसोबत प्रत्यक्ष संवाद साधता येणार आहे. यासाठी जस्मिनने पोस्टर प्रेझेंटेशनची तयारी सुरु केली आहे.

भारतात प्रचंड सौर ऊर्जा आहे. या उर्जेचे रासायनिक उर्जेत आणि त्यापासून विद्युत उर्जेत रुपांतर करणाऱ्या प्रोस्काइट मटेरियलवर जास्मिन यांचा अभ्यास आहे. सौर उर्जेचा वापर करायचा असल्यास लागणाऱ्या साहित्य सामग्रीची किंमत ही सहजासहजी परवडणारी नसते. या सामग्रीचा खर्च कमी यावा आणि त्याची उपलब्धता वाढावी यासाठी जास्मीन विशेष प्रयत्नशील आहेत. मूळच्या सोलापूरच्या वाखरी गावच्या असलेल्या जास्मिन यांनी डिफ्रंट नॅनो मटेरीअल, सुपर कॅपासिटर, कार्बन मटेरिअल, मेटल ऑक्साइड या संदर्भातील काम शिवाजी विद्यापीठात केले आहे. जास्मिन यांना घरातून पाठिंबा तर होताच तसेच डॉ. पी. एस. पाटील यांचे विशेष सहाय्य लाभले आहे. सध्या जास्मिन या डॉ. पी. एस. पाटील यांच्याकडेच डीएसटी वुमन सायंटीस्ट म्हणून कार्यरत आहेत.

तरुण भारत
6 MAY 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती विद्यापीठातर्फे उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठातील अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्याला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये डॉ. पवार यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशासकीय अधिकाऱ्यांतर्फे करण्यात आले. डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन येथील अर्धपुतळ्यालाही पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी वक्त्यांनी डॉ. पवार यांनी राबविलेल्या अनेक विधायक उपक्रमांना उजाळा दिला.

यप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. पी. व्ही. अनुभुले, डॉ. डी. बी. शिंदे, डॉ. एन. एस. चव्हाण, प्रा. सी. एच. भोसले, डॉ. मानसिंग जगताप, डॉ. अशोकराव जगताप, डॉ. संभाजी कणसे, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. सी. टी. पवार, प्रा. अविनाश सरगर, डॉ. बी. एन. पाटील, अशोक साबळे, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते..



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या अर्धपुतळ्याला अभिवादन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी 6 MAY 2016



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांना जयंतीनिमित्त अभिवादन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य मानसिंगराव जगताप, प्राचार्य डॉ. संभाजीराव कणसे, प्राचार्य एस. जे. नाईक, डॉ. सी. टी. पवार आदी.

## डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठ अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या फोयरमधील मान्यवरांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. 'डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन' येथेही कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी. के. गायकवाड, प्रौढ अधिविभाग प्रमुख पी. टी. गायकवाड, डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. टी. टी. शिर्के, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. पी. व्ही. अनभुले, डॉ. टी. बी. शिंदे, डॉ. एस. एम. चव्हाण, प्रा. सी. एन. भोसले, प्राचार्य मानसिंगराव जगताप, प्राचार्य अशोकराव जगताप, प्राचार्य डॉ. संभाजीराव कणसे, प्राचार्य एस. जे. नाईक, डॉ. सी. टी. पवार, प्रा. अविनाश भाले, प्राचार्य बी. एन. पाटील, अशोक साबळे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी 6 MAY 2016

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठ अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्येही मान्यवरांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. 'डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन' येथेही कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या अर्धपुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख पी. टी. गायकवाड, डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. पी. व्ही. अनभुले, डॉ. डी. बी. शिंदे आदी उपस्थित होते.